आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१७ ऑगस्ट २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते राजधानी दिल्लीत अकरा हजार कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचं उद्घाटन

- अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचं मायदेशी आगमन

- मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचचं उद्घाटन सरन्यायाधीशांच्या हस्ते

- TAIT, अर्थात शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धीमत्ता चाचणी परीक्षेचा निकाल उद्या

**आणि**

- राज्यात सर्वदूर पाऊस, १० जिल्ह्यांना आज आणि उद्यासाठी हवामान विभागाचा रेड अलर्ट

**<><><><><><>**

गेल्या अकरा वर्षांत पायाभूत सुविधांसाठीचा निधी सहा टक्क्यानी वाढवला असून विविध प्रकल्पांमुुळे रोजगारात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राजधानी दिल्लीत अकरा हजार कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचं उद्घाटन केलं, त्यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधित केलं.

या विकास प्रकल्पात द्वारका द्रुतगती मार्गाचा दिल्ली विभाग आणि शहरी विस्तार रस्ता-२ यांचा समावेश आहे.

येत्या काळात केंद्र सरकार धोरणात्मक सुधारणा करणार असून वस्तू आणि सेवा करातली सुधारणा याचाच भाग आहे, याचा फायदा देशातल्या नागरिकांना होईल, असं प्रधानमंत्री म्हणाले. यावेळी प्रधानमंत्र्यांनी स्वदेशी उत्पादनांचं महत्त्व

अधोरेखित करत व्यापारी, दुकानदारांना स्वदेशी वस्तूंची विक्री करण्याचं तसंच नागरिकांना स्वदेशी वस्तू खरेदी करण्याचं आवाहन केलं.

दरम्यान, उद्घटना आधी प्रधानमंत्र्यांनी प्रकल्पाचं बांधकाम करणाऱ्या मजुरांशी संवाद साधला. तसंच शहरी विस्तार रस्ता २ चं अवलोकन केलं.

या कार्यक्रमाला केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे पहिले भारतीय ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आज पहाटे मायदेशी परतले.  दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळावर केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंग, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि इस्त्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही नारायणन यांनी त्यांचं स्वागत केलं. शुक्ला यांचे कुटुंबियही  यावेळी त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते.  नासाच्या एक्झिओम ४ मोहिमेवरून परतल्यानंतर त्यांचं शरीर पृथ्वीवरच्या वातावरणाला पुन्हा सरावण्याच्या अनुषंगानं अमेरिकेत काही दिवस पुनर्वसन शिबिरात उपस्थित राहून  ते आता भारतात परतले आहेत. आपल्या मूळ गावी लखनौला जाण्यापूर्वी ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतील.

**<><><><><>**

मतदार याद्या तयार करताना प्रत्येक पायरीवर कमालीची पारदर्शकता बाळगली जाते असं केंद्रीय निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. निवडणूक आयोगाच्या कामाबद्दल राजकीय पक्ष आणि व्यक्तिंनी शंका घेतल्याबद्दल आयोगाने नाराजी व्यक्त केली आहे. याद्या तयार करतेवेळी त्याबाबतच्या सूचना आणि हरकती नोंदणं उचित आहे. तसं झाल्यास त्यांचा विचार करुन पडताळणी आणि सुधारणा करता येते. राजकीय पक्षांचे बुथ पातळीवरचे एजंट देखील  योग्य वेळी हरकती उपस्थित करत नाहीत. मतदार याद्या आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचं आयोगाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगासह, देशातल्या दहा राज्यांनी यंदाच्या जुलै महिन्यात १०० टक्के तक्रारींचं निवारण करून ग्राहक तक्रार निवारणामध्ये महत्वाची कामगिरी नोंदवली आहे. या कालावधीत दाखल झालेल्या प्रकारणांपेक्षा निपटारा झालेल्या प्रकरणांची संख्या जास्त असल्याचं ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे.

ई-जागृती व्यासपीठ सुरु झाल्यापासून अनिवासी भारतीयांसह दोन लाखांहून अधिक वापरकर्त्यांनी त्यावर नोंदणी केली असून, या मंचावर यंदा वर्षात एकूण ८५ हजार ५३१ प्रकरणं दाखल झाल्याचं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर इथल्या सर्किट बेंचचं उद्घाटन आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार आहे. या सर्किट बेंचचा लाभ कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांना होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक अराधे आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

मुंबईतल्या कबुतरखान्यांमध्ये कबुतरांना खाद्य पुरवण्याबाबत पर्याय सुचवणारे तीन अर्ज मुंबई महानगरपालिकेकडे दाखल झाले असून ते महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अवलोकनासाठी उपलब्ध आहेत. नागरिकांना या अर्जांवर आपल्या हरकती आणि सूचना उद्यापासून येत्या २९ ऑगस्ट २०२५ पर्यंत दाखल करता येतील.

**<><><><><>**

TAIT, अर्थात शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धीमत्ता चाचणी परीक्षा २०२५ चा निकाल उद्या प्रसिद्ध करणार असल्याचं महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेनं कळवलं आहे.

या परीक्षेसाठी एकूण २लाख २८ हजार ८०८ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २ लाख ११ हजार ३०८ उमेदवारानी परीक्षा दिली. त्यातल्या बी.एड. आणि डी.एल.एड. परीक्षेला प्रविष्ट असलेल्या १० हजार ७७९ उमेद वारांनी, विहित मुदतीत, उत्तीर्ण झाल्याचं प्रमाणपत्र सादर केलं आहे. त्यांचाही निकाल प्रसिद्ध केला जाईल. मात्र ज्यांनी ही माहिती अद्याप सादर केलेली नाही, अशा ६ हजार ३१९ उमेदवारांचा निकाल राखीव ठेवला जाईल, असंही परीक्षा परिषदेनं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><><>**

वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीच्या नीट पीजी परीक्षेचा निकाल येत्या ३ सप्टेंबरला जाहीर होणार आहे. या परीक्षेला राष्ट्रीय चाचणी मंडळाने गेल्या ३ ऑगस्ट रोजी ही परीक्षा घेतली होती. अडीच लाखाहून जास्त विद्यार्थी बसले होते. nbe.edu.in आणि natboard.edu.in या संकेतस्थळांवर निकाल पाहता येतील.

**<><><><><><>**

राजे रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार उद्या मुंबईत दाखल होणार असून राज्य शासनातर्फे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर या तलवारीचं स्वागत करण्यात येईल. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या तलवारीचं लोकार्पण होईल. त्यानंतर या तलवारीसह युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या १२ गडांच्या माहितीचं प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. हे प्रदर्शन १९ ते २५ ऑगस्ट दरम्यान, सकाळी ११ ते संध्याकाळी ७ या वेळेत पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीत सर्वांना विनामूल्य पाहता येईल.

**<><><><><><>**

श्रीकृष्णजन्मानंतरचा गोपाळकाला काल राज्यात सर्वत्र उत्साहाने साजरा झाला. मुंबई आणि उपनगरातल्या दहीहंडी महोत्सवात यंदा १० थर रचण्याचा विक्रम दोन मंडळांनी नोंदवला. दहीहंडी  खेळताना एका गोविंदांचा मृत्यू झाला तर ३०० हून जास्त जखमी झाले. जखमींवर शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

**<><><><><><>**

जम्मू आणि काश्मीरच्या जम्मू विभागात कथुआ जिल्ह्यातल्या एका गावात काल मध्यरात्री झालेल्या ढगफुटीमध्ये चार जण मृत्युमुखी पडले, तर सहा जण जखमी झाले. जम्मू-काश्मीर पोलिस आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचं संयुक्त पथक या ठिकाणी पोहोचलं असून, स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचाव कार्य सुरु आहे. पावसामुळे या भागातले रेल्वे ट्रॅक आणि महामार्गाचं नुकसान झालं आहे.

**<><><><><><>**

राज्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस होत असून नद्यांची पाणीपातळी वाढली आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यात आज पावसाचा जोर कायम असून, आज सकाळी संपलेल्या २४ तासांत खेड तालुक्यात सर्वाधिक १७८ मिलिमीटर, दापोली आणि चिपळूण या तालुक्यांत प्रत्येकी १२५ मिलिमीटर, तर मंडणगडमध्ये ११६ मिलिमीटर पाऊस पडला. खेडमधल्या जगबुडी नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून बाजारपेठ परिसरात पाणी शिरलं आहे. नारिंगी,कुडावळे नद्या दुथडी भरुन वाहत आहेत. दापोली-मंडणगड रस्त्यावरची वाहतूक बंद झाली आहे. माखजन इथंही बाजारपेठेत पाणी शिरलं आहे.

**हिंगोली** जिल्ह्यातल्या औंढा नागनाथ तालुक्यातल्या पूर्णा प्रकल्पाचे सिद्धेश्वर धरण पूर्णक्षमतेने भरले. आज सकाळी धरणाचे आठ दरवाजे एक फूट उघडण्यात आले असून सात हजार घनफूट प्रति सेकंद वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. तसंच

इसापूर धरणाचे तेरा दरवाजे उघडण्यात आले असून, धरणातून सध्या ५४ हजार ४६६ घनफूट प्रति सेकंद पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे पैनगंगा नदी काठावरील गावांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**वाशीम** जिल्ह्यात सलग दुसऱ्यांदा रात्रभर मुसळधार पाऊस झाला. अडाण नदीला पूर आल्यानं शेलूबाजार इथं नागरी वस्तीत पाणी शिरलं आहे. प्रशासनाने तातडीने रात्रीच रहिवाशांना स्थानिक शाळेत हलविलं. या मार्गावरील वाहतूक समृद्धी मार्गे वळविण्यात आली. मालेगाव तालुक्यात जौळका येथे काटेपूर्णा नदीवर पूल पाण्याखाली गेल्यानं वाहतूक वाशीम मार्गे वळविण्यात आली.

**<><><><><>**

राज्यात आजपासून २१ तारखेपर्यंत मुसळधार पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. या कालावधीत मराठवाड्यात काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह अधूनमधून ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांना हवामान विभागाने रेड अलर्ट दिला आहे. येत्या २० तारखेपर्यंत कोकण किनाऱ्यावर समुद्र खवळलेला राहील मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये असा सल्ला देण्यात आला आहे.

**//<><><><><>//**